महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
बिमूल गोल्ड बिल्ड इमारत, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार सर्कल, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४.
Email Id: contact-secretary@mpsc.gov.in Website: https://mpsc.gov.in, https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc +९१-२२-६२८५६००

क्रमांक : सीएमए-०४२६/प्र.क्र४२/२०२६/जाहिरात दिनांक :- २२ जुलै, २०२६

-: शुद्धिपत्रक :-

महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा - २०२६

जाहिरात क्रमांक: ०१७/२०२६, दिनांक २५ जून, २०२६

आयोगामार्फत महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा - २०२६ मधून एकूण २६१९ रिक्त पदे भरण्यासाठी दिनांक २५ जून, २०२६ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली असून, आयोगाच्या दिनांक १६ जुलै, २०२६ रोजीच्या शुद्धिपत्रकानुसार प्रस्तुत परीक्षा दिनांक २५ ऑक्टोबर, २०२६ रोजी प्रचलित पद्धतीने (Offline - OMR आधारित) घेण्यात येणार आहे. तसेच सदर शुद्धिपत्रकान्वये जाहिरातीस अनुसरून अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकास दिनांक ३१ जुलै, २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

२. भरती प्रक्रिया सुसूत्रीकरण व सुधारणा संदर्भातील शासन निर्णय , सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : प्रानिमं१२२४/प्र.क्र.७०/सेवा-४,(का.१३-अ), दिनांक ०५ मे, २०२६ अनुसार महाराष्ट्र गट-क सेवेसाठी आयोगाकडे मागणीपत्रे प्राप्त होत आहेत. त्यामुळे प्रस्तुत परीक्षेच्या परीक्षा योजनेमध्ये नमूद संवर्गाव्यतिरिक्त समान अर्हता असणाऱ्या नवीन संवर्गांचा महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त परीक्षा – २०२६ मध्ये समावेश करण्यात येणार असून प्राप्त मागणीपत्रांचा संक्षिप्त तपशील खालीलप्रमाणे आहे :-

अ.क्र.	विभाग	पदनाम	एकूण पदे	आवश्यक अर्हता	जाहिरातीमध्ये नमूद वयोमर्यादा गणण्याचा दिनांक
१	महसूल व वन विभाग	ग्राम महसूल अधिकारी (तलाठी), गट-क (विविध नियुक्ती प्राधिकारी)	१५३९	सांविधिक विद्यापीठाची कोणत्याही शाखेतील पदवी	सेवा प्रवेश नियमानुसार अर्ज स्वीकारण्याचा अंतिम दिनांक म्हणजेच दिनांक ०५ ऑगस्ट , २०२६
२	राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई	वरिष्ठ अभिलेखापाल/ वरिष्ठ लिपिक/ अभिलेखापाल, गट-क	११	कोणत्याही शाखेतील पदवी	(१)जाहिरातीनुसार दिनांक ०१ ऑक्टोबर, २०२६ (२)अगोदरच शासन सेवेत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा पाच वर्षापर्यंत शिथिल राहील
३		सहायक अधीक्षक, गट-क	११	कोणत्याही शाखेतील पदवी	
४	कृषि व प. दु. म. विभाग	सहाय्यक मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी (तांत्रिक),गट-क	२५४	मत्स्यविज्ञान विषयातील किमान द्वितीय श्रेणीतील पदवी (B.F.Sc.) धारण करणे आवश्यक	जाहिरातीनुसार दि. ०१ ऑक्टोबर, २०२६
५	नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा कार्यालय	लिपिक-टंकलेखक (विविध नियुक्ती प्राधिकारी)	२३०	(१)कोणत्याही शाखेतील पदवी (२)जाहिरातीमध्ये लिपिक-टंकलेखक पदाकरीता नमूद केल्यानुसार टंकलेखन अर्हता आवश्यक	जाहिरातीनुसार दि. ०१ ऑक्टोबर, २०२६
६	अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग		१५५		
७	आदिवासी विकास विभाग		६९		
८	महसूल व वन विभाग		४८०		
९	महसूल व वन विभाग	लिपिक-टंकलेखक नोंदणी व मुद्रांक विभाग	३३९		
		एकूण	**३०८८**		

३. उपरोक्त तक्त्यातील संवर्गाचा सामाजिक व समांतर आरक्षणनिहाय पदांचा तपशील तसेच शासनाकडून सुधारित/अतिरिक्त/स्वतंत्र मागणीपत्राद्वारे प्राप्त नवीन संवर्गातील पदांचा समावेश पूर्व परीक्षेच्या निकालापूर्वी शुद्धिपत्रकाद्वारे करण्यात येईल. सदर बाब विचारात घेऊन

उमेदवारांनी....

उमेदवारांनी पूर्व परीक्षेकरीता अर्ज सादर करणे आवश्यक राहील. यास्तव पूर्व परीक्षेच्या जाहिरातीमध्ये पद आरक्षित नसल्यामुळे, पदसंख्या कमी असल्यामुळे अथवा संवर्गाचा समावेश नसल्यामुळे पूर्व परीक्षेसाठी अर्ज सादर केला नसल्याची व त्यामुळे निवडीची संधी वाया गेल्याबाबतची कोणतीही तक्रार नंतर कोणत्याही टप्प्यावर विचारात घेतली जाणार नाही.

४. सदर शुद्धिपत्रकास अनुसरून महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२६ करीता अर्ज सादर करण्यास खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे.

अ.क्र.	तपशील	विहित कालावधी
१	अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक	**दिनांक ०५ ऑगस्ट, २०२६ रोजी २३:५९ वाजेपर्यंत**
२	ऑनलाईन पद्धतीने विहित परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक	**दिनांक ०८ ऑगस्ट, २०२६ रोजी २३:५९ वाजेपर्यंत**
चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्याची सवलत बंद करण्यात आली असून उमेदवारांनी फक्त ऑनलाईन पद्धतीने (डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, नेट बँकिंग, UPI) शुल्क भरणे आवश्यक आहे.		

५. सदर शुद्धिपत्रकानुसार महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त परीक्षा – २०२६ मधून **एकूण ५७०७** पदांकरीता भरतीप्रक्रिया राबविण्यात येईल.

६. मूळ जाहिरातीमधील तसेच दिनांक १६ जुलै, २०२६ रोजीच्या शुद्धिपत्रकातील इतर अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल नाही.

(सं. पां. देशमुख)
उप सचिव, जाहिरात
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.